# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परिपत्रक

**परिपत्रक क्र. आस्था/आरओ/३१/२०२६**

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाद्वारे दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने दि. ०३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिन व दि. ३ ते ९ ऑक्टोबर हा कालावधी 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे हे १०० वे वर्ष आहे. या पार्श्वभूमीवर मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या उपस्थितीत दि. २२.०८.२०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे व दि. २२.०९.२०२६ रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण व मा. मंत्री, मराठी भाषा यांच्यात झालेल्या बैठकीत, मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व तिचे जतन, संवर्धन व्हावे याकरिता महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये 'अभिजात मराठी अभिमान मराठी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. हा कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि मा. मंत्री, उद्योग आणि मराठी भाषा यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध गायक डॉ. अभिजित कोसंबी व प्रसेनजीत कोसंबी, अभिनेते दिगंबर नाईक व नृत्य दिग्दर्शक श्री. सुभाष नकाशे यांच्या 'अभिजात मराठी अभिमान मराठी' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम मा. कुलगुरु प्रा. (डॉ.) विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण आणि मा. ना. श्री. उदय सामंत, मा. मंत्री उद्योग आणि मराठी भाषा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन बोली भाषा अभ्यासक तथा संशोधक डॉ. रमेश सूर्यवंशी यांच्या हस्ते होणार असून प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) प्रवीण वक्ते व राज्य मराठी संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांची उपस्थित असेल.

या कार्यक्रमास सर्वांची उपस्थिती बंधनकारक आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम : 'अभिजात मराठी अभिमान मराठी'
मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६
वेळ - दुपारी ३.३० वाजता
स्थळ- विद्यापीठ नाट्यगृह

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )(
संदर्भ :- आस्था/आरओ/२०२६/१३ )(
दिनांक :- ०९-१०-२०२६ )(

कुलसचिव

या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव:-
१) सर्व शैक्षणिक विभागप्रमुख,
२) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख,
३) संचालक, युनिक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.